आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८फेब्रुवारी २०२५ मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्यमंत्रिमंडळाची मान्यता
- देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी ज्ञानेश कुमार यांची नेमणूक / हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचा आदेश डावलून घाईघाईने घेतल्याची काँग्रेसची टीका
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी यांची शिष्टमंडळ स्तरावर आज नवी दिल्लीत महत्त्वपूर्ण चर्चा
- वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी रणवीर अलाहबादीयाला अटकेपासून संरक्षण

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई विरुद्धच्या उपान्त्य सामन्यात विदर्भाचा पहिल्या डावात ३८३ धावांचा डोंगर

**<><><><><>**

सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. मंत्रालयात झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेतल्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी सुमारे सोळाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या योजनेतून अवर्षण प्रवण भागात १ लाख ८ हजार १९७ हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा मिळणार आहे. जळगांव जिल्ह्यातल्या चाळीसगावमधल्या वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या पावणे तेराशे कोटी रुपयांच्या तरतुदीलाही सरकारनं मान्यता दिली. यामुळे

चाळीसगाव आणि भडगाव तालुक्यातल्या सुमारे ८ हजार तीनशे हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध होईल. अंमली पदार्थ विरोधी कृती दलासाठी ३४६ नवीन पद निर्मिती करायलाही आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली.

विकीपीडियावर छत्रपती संभाजी महाराजांविषयी लिहिलेला आक्षेपार्ह मजकूर काढण्याचे आदेश राज्य सरकारनं सायबर विभागाला दिले आहेत. मंत्रीमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

**<><><><><>**

देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवडणूक आयोगाचे सध्याचे सदस्य ज्ञानेश कुमार यांची नेमणूक झाल्याचं केंद्रीय विधी मंत्रालयाने जाहीर केलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्तपदाच्या नेमणुकीविषयीचा नवा कायदा लागू झाल्यानंतरची ही पहिलीच नेमणूक आहे. नवीन कायद्यानुसार नियुक्ती समितीची बैठक काल नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी बैठकीला उपस्थित होते. निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीविषयी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेचा निकाल लागेपर्यंत नवीन आयुक्तांची नेमणूक लांबणीवर टाकावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी बैठकीत मांडली.

ज्ञानेश कुमार भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८८च्या तुकडीतले केरळ कॅडरचे अधिकारी असून त्यांच्याकडे केरळ राज्यशासन तसंच संरक्षण, संसदीय कार्य, आणि सहकार मंत्रालयात काम करण्याचा अनुभव आहे. देशाचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ते उद्या कार्यभार स्वीकारतील. ज्ञानेश कुमार यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त

राजीव कुमार आज सेवा निवृत्त होत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या जागी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी विवेक जोशी यांची नेमणूक झाली आहे. ते भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८९च्या तुकडीतले हरयाणा केडरचे अधिकारी आहेत. त्यांचा कार्यकाळ २०३१ पर्यंत असेल. आयोगाचे तिसरे सदस्य म्हणून केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे माजी अध्यक्ष सुशील चंद्रा यांची यापूर्वीच नेमणूक झाली आहे.

दरम्यान मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीविषयी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालय उद्या तातडीनं सुनावणी घेणार आहे. हा मुद्दा न्यायप्रविष्ट असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती समितीने नव्या मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक जाहीर केल्याची माहिती याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयात दिली. तेव्हा न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंग यांनी उद्या तातडीने सुनावणी घेऊ असं सांगितलं.

<><><><><>

निवड प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेलं असताना मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीचा निर्णय मध्यरात्री जाहीर करणं, प्रधानमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना अशोभनीय असल्याची टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी सुनावणी होणार असल्यानं काल रात्री या निवडीसाठी आयोजित केलेली बैठक पुढं ढकलण्याची सूचना राहुल गांधी यांनी केली होती. आपलं मत वेगळं असल्याचं पत्रही निवड समितीला दिलं होतं, असं त्यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केलं आहे. ते निवड समितीचे सदस्य आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचं उल्लंघन करुन, आणि निवड समितीतून सरन्यायाधिशांना वगळून मोदी सरकारनं आपल्या निवडणूक प्रक्रियेच्या एकात्मतेविषयी कोट्यवधी मतदारांची चिंता वाढवली आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी यांची शिष्टमंडळ स्तरावर आज नवी दिल्लीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. शेख तमीम यांचं काल रात्री नवी दिल्ली विमानतळावर आगमन झालं त्यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. शेख तमीम यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन चर्चा केली. राष्ट्रपती भवनात पाहुण्याना पारंपरिक मानवंदना देण्यात आली.

शेख तमीम यांच्यासोबत उच्चपदस्थ शिष्टमंडळ आलं असून व्यापार, गुंतवणूक, उर्जा, आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्याबद्दल या दौऱ्यात ते चर्चा करणार आहेत. कतार बरोबर भारताचे दृढ आर्थिक संबंध आहेत. अनेक कतारी कंपन्यांनी भारतात तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, विमानतळ, बंदरं अशा विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.

कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजतर्फे आयोजित भारत कतार संयुक्त व्यापार मंचाच्या कार्यक्रमात भारत आणि कतार दरम्यान दोन समझोता करार झाले. कतारचे वाणिज्यमंत्री शेख फैज़ल बिन थानी अल थानी आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रीय नागरी भूस्थानिक आधारित जमीन सर्वेक्षण अर्थात 'नक्शा' या उपक्रमाचं उद्घाटन आज केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते

होणार आहे. याअंतर्गत २६ राज्यांमधल्या नागरी भागात भूसर्वेक्षण केलं जाणार आहे. शहरी भागात जमिनीच्या मालकीचे अचूक आणि विश्वासार्ह तपशील तयार व्हावेत यासाठी जमीन नोंदणी करणं आणि माहिती अद्ययावत करण्याचं काम केलं जाईल. माहिती तंत्रज्ञानावर आधारित या यंत्रणेमुळे पारदर्शकता, कार्यक्षमता वाढेल आणि शाश्वत विकासालाही त्याचा हातभार लागेल असं ग्रामविकास मंत्रालयानं नमूद केलं आहे. महाराष्ट्रातल्या १० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे सर्वेक्षण होणार असून, त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड, तसंच बुलडाणा नगर परिषद क्षेत्राचा समावेश आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने यूट्युबर रणवीर अलाहबादीयाला वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. रणवीर विरोधात अनेक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्या विरोधात रणवीरनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. रणवीरच्या टिपण्ण्यांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. तसंच त्याला आपलं पारपत्र पोलीस ठाण्यात जमा करण्याचे आणि न्यायालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय देश न सोडण्याचे निर्देश खंडपिठानं दिले आहेत.

**<><><><><>**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप होत असतील, तर त्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. त्या आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी

देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. या प्रकरणाला ६९ दिवस पूर्ण झाले तरी अद्याप तपास पूर्ण झालेला नाही. आपण येत्या दोन दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत, असंही सुळे यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज कार्यभार स्वीकारला. मुंबईच्या  टिळक भवन मुख्यालयात सपकाळ यांनी मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कडून पदाची सूत्रं स्वीकारली. जातीवादी शक्तींच्या विरोधात लढा देण्यासाठी आणि काँग्रेस पक्षाचा विचार राज्यात सर्वत्र पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असल्याचं सपकाळ यावेळी म्हणाले. यावेळी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत नागपूरमधे सुरू असलेल्या उपान्त्य सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात मुंबईसमोर ३८३ धावांचा डोंगर उभारला आहे. काल नाणेफेक जिंकून विदर्भाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिवसअखेर त्यांच्या ५ बाद ३०८ धावा झाल्या होत्या. मुंबईचा डाव सुरु झाला असून चहापानापर्यंत  त्यांच्या २ गडी बाद ८५ धावा झाल्या होत्या.  अहमदाबाद मधे दुसरा उपांत्य सामना केरळ आणि गुजरात दरम्यान सुरू असून, केरळनं काल पहिल्या दिवसअखेर ४ बाद २०६ धावा केल्या. आज दुसऱ्या दिवशी, शेवटचं वृत्त मिळालं तेव्हा त्यांच्या ५ बाद ३५४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या ग्रामसेवक संघटनेने आजपासून असहकार आंदोलन सुरू केलं आहे. मागच्या पाच वर्षांपासून रखडलेले आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरित करावेत, प्रगती योजनेचा लाभ द्यावा, डोंगरकडा इथल्या चौदाव्या वित्त आयोगाच्या कामाचं मूल्यांकन करावं, वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयकं तातडीने निकाली काढावीत, मुद्रांक शुल्काची परिपूर्ण माहिती द्यावी, यासह इतर मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे.

**<><><><><>**

वारकरी संप्रदायातल्या योगदानासाठी जळगाव जिल्ह्यातले ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली परदेशी यांना यंदाचा राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढच्या महिन्यात १७ तारखेला लोणी बुद्रुक इथे या पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात येणार आहे.

**//<><><><><>//**